॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२१ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या उन्हाळी (एप्रिल/मे/जून-२०२५) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांना एप्रिल महिन्यापासून प्रारंभ होत आहे त्या पार्श्वभूमीवर कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या असून **'कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी कॉपी करायला नाही म्हणा'** असे आवाहन परीक्षार्थींना केले आहे.

कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना पत्र लिहून एप्रिल महिन्यात सुरु होणाऱ्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या असून या परीक्षा कॉपीमुक्त व सुरळीत व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त करून विद्यार्थ्यांनी स्वत: कॉपी करण्यासाठी नकार द्यावा असे आवाहन केले आहे. परीक्षा ही आपल्या जबाबदारीची भावना वृध्दींगत करणारी असते यातून आत्मविश्वास वाढतो आणि आपल्या क्षमतांचे मूल्यांकन करता येते. कोणताही तणाव न घेता व न घाबरता परीक्षांना सामोरे जावे. शिक्षकांशी, पालकांशी, जवळच्या मित्रांशी संवाद साधावा. तसेच परीक्षा देत असतांना बेंचच्या आजूबाजूला अथवा बेंचवर काही लिहिलेले नाही याची खात्री करावी. आपल्याला मिळालेली उत्तरपत्रिकेची पाने पूर्ण आहेत, छापलेली नाहीत हे तपासून उत्तरपत्रिका खराब होणार नाही याची खबरदारी घ्यावी. तसेच उत्तर पत्रिकेत लिहितांना कुठल्याही धार्मिक वा अन्य ओळखदर्शक चिन्हांचा वापर करू नका अशी दक्षता घेवून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तणावमुक्त, निर्भय वातावरण देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे असा विश्वास पत्राद्वारे विद्यार्थ्यांना दिला.परीक्षेच्या काळात झोप पूर्ण घ्या आणि आरोग्य सदृढ ठेवा असे आवाहन कुलगुरूंनी केले आहे.

**बातमी नं.२**

जळगाव दि. २१ ( प्रतिनिधी) देशातील युवा शक्तीचा उपयोग भारत बलशाली राष्ट्र होण्याकरीता होवू शकतो असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले.

युवक कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार, प्रादेशिक संचालनालय व राष्ट्रीय सेवा योजना पुणे तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसद स्पर्धेस आज दि. २१ रोजी प्रारंभ झाला. त्यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देतांना कुलगुरू बोलत होते. प्रा. माहेश्वरी पुढे म्हणाले की, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा विकसनशील देश असून भारतात युवकांची सर्वात जास्त संख्या आहे. या युवाशक्तीने भारताला बलशाली राष्ट्र बनवावे असे सांगून आपल्या मातृभाषेत व्यक्त होवून स्पर्धेत आपली छाप पाडावी.

सुरूवातीस या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी केले. प्रास्ताविक रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी केले. **'एक देश एक निवडणूक : विकसित भारतासाठी नवी पायवाट'** या विषयावर विद्यार्थ्यांना तीन मिनीटात संकल्पना कोणत्याही भाषेत सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. ही स्पर्धा भौतिकशास्त्र प्रशाळेत करण्यात आली आहे. या स्पर्धेत आज धुळे, नंदुरबार व बुलढाणा या जिल्ह्यातील ६० पैकी ५०विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. सूत्रसंचालन डॉ. मनोज इंगोले यांनी केले. स्पर्धेचे व्यवस्थापन डॉ. संजय शिंगाणे, डॉ. विशाल देशमुख, डॉ. कविता पाटील यांनी केले. उद्या जळगाव जिल्ह्यातील ६१ विद्यार्थी सादरीकरण करणार आहेत. या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी २३२ विद्यार्थ्यांमधून १२१ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या स्पर्धेतून सर्वोतकृष्ट १० विद्यार्थी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवडले जाणार आहेत.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २१ मार्च, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता